औरंगाबाद जिल्हयातील औरंगाबाद तालुक्यात अपर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राफेब-२०१५/ प्र.क्र.२९/ म-१०
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
तारीख: ३१ डिसेंबर, २०१५

वाचा :-

१) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०११/ मशाका/ प्राफेब/ सीआर-१३१ कावी-५९३, दि.८.०४.२०१५.

२) वित्त विभागाचे पृष्ठांकन क्र. पदनि-२०१५/ प्र.क्र. ५६/१५/ विसु-१ दि. ०२.१२.२०१५ अन्वये निर्गमित उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.९.११.२०१५ रोजी झालेल्या ९६ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

प्रस्तावना :-

औरंगाबाद हे जिल्हयाचे तसेच महसूली विभागाचे मुख्यालयाचे ठिकाण असून ऐतिहासिक शहर आहे. औरंगाबाद परिसरात औद्योगिकीकरण झपाटयाने होत असून सदर शहर पर्यटन स्थळे, प्रशासकीय कार्यालये, न्यायिक, शैक्षणिक व अन्य दृष्टिकोनातून महत्वाचे आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद शहराची लोकसंख्या १४,१२,३४० इतकी आहे व औरंगाबाद तालुक्याची लोकसंख्या १६,२०,१७० इतकी आहे. औरंगाबाद तालुक्यात ११५ ग्रामपंचायती, १८ पंचायत समिती सदस्यांचे कार्यक्षेत्र, ९ जिल्हा परिषद गट, औरंगाबाद महानगरपालिका तसेच ५ विधानसभा मतदारसंघ, १ लोकसभा मतदारसंघ यांचा समावेश असल्याने औरंगाबाद तहसिल कार्यालयाकडे मोठया प्रमाणात कामकाज असून ते विहित मुदतीत पार पाडण्याकरिता तहसिल कार्यालयावर मोठा प्रशासकीय ताण पडत असल्याचे आणि उपलब्ध अधिकारी/ कर्मचारीसंख्या अपुरी पडत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर औरंगाबाद या तालुक्यासाठी अपर तहसिलदार यांचे कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

औरंगाबाद जिल्हयातील औरंगाबाद तालुक्यासाठी अपर तहसिलदार, औरंगाबाद यांचे कार्यालय स्थापन करण्यास व त्याअनुषंगाने पुढील प्रमाणे पदमंजूरीस व अन्य बाबींस या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१) विद्यमान औरंगाबाद तहसिल कार्यालय बळकट करण्याच्या दृष्टीने अपर तहसिलदार, औरंगाबाद यांच्या नवीन कार्यालयासाठी खालील १३ पदे नियमित वेतनश्रेणीवर विशेष बाब म्हणून मंजूर करण्यास शासन मान्यता देत आहे.तसेच सदर पदे ही सध्याच्या त्या त्या संवंर्गाचा एक भाग राहतील.

अ.क्र	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	पदसंख्या
१.	अपर तहसिलदार	१५६००-३९१००, ग्रेड पे-५०००/-	१
२.	नायब तहसिलदार	९३००-३४,८००, ग्रेड पे-४३००/-	१
३.	अव्वल कारकून	५२००-२०२०० ग्रेड पे-२८००/-	२
४.	लिपिक-टंकलेखक	५२००-२०२०० ग्रेड पे-१९००/-	८
५.	वाहन-चालक	५२००-२०२०० ग्रेड पे-१९००/-	१
		एकूण	**१३**

२) तहसिलदार, औरंगाबाद यांचे कार्यक्षेत्रात ६ मंडळे खालीलप्रमाणे राहतील.

अ.क्र.	महसूल मंडळाचे नाव
१.	चित्तेपिंपळगाव
२.	करमाड
३.	लाडसांवगी
४.	चिकलठाणा (देवळाई व गांधेली साझा वगळून)
५.	चौका
६.	हर्सुल (हर्सुल मंडळातील हर्सुल गांव वगळून तसेच ओहर साझेतील जाधववाडी वगळून)

३) अपर तहसिलदार,औरंगाबाद यांचे कार्यालय औरंगाबाद येथेच राहील व त्यांच्या कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे ४ मंडळे राहतील.

अ.क्र.	महसूल मंडळाचे नाव
१.	औरंगाबाद
२.	भावसिंगपुरा
३.	उस्मानपुरा
४.	कांचनवाडी (चिकलठाणा मंडळातील देवळाई व गांधेली साझा) हर्सुल मंडळातील फक्त हर्सुल गांव व ओहर साझेतील जाधववाडी.

४) तहसिलदार, औरंगाबाद व अपर तहसिलदार, औरंगाबाद यांच्या कार्यक्षेत्रातील महसूल मंडळांतर्गत तलाठी साझे व त्यामध्ये अंतर्भूत होणा-या गावांची यादी प्रसिद्ध करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर करण्यात यावी.

५) अपर तहसिलदार, औरंगाबाद यांचे प्रतिवेदन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद आणि नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, औरंगाबाद हे काम पाहतील.

६) अपर तहसिलदार, औरंगाबाद यांना या शासन निर्णयान्वये कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

७) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम १३ पोटकलम (३) नुसार तहसिलदार औरंगाबाद यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्ती अपर तहसिलदार, औरंगाबाद यांना त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रापुरत्या प्रदान करण्याबाबत स्वतंत्रपणे अधिसूचना निर्गमित करण्यात येईल.

८) औरंगाबाद जिल्हयातील औरंगाबाद तालुक्यात अपर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याकरिता येणारा खर्च "मागणी क्र. सी-१, २०५३, जिल्हा प्रशासन, (००) ०९४ इतर आस्थापना, (०१) उपविभागीय आस्थापना, (०१) (०६) आयुक्त, औरंगाबाद संगणक सांकेतांक (२०५३ ०२२४)" या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व तो सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा. मंजूर तरतूद अपुरी पडत असल्यास आठमाही अंदाजपत्रक सादर करताना वाढीव तरतूदीची मागणी करावी व ते शक्य नसल्यास पूरक मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

९) सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व नवीन पदनिर्मिती , पदांचे पुनरुज्जीवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.९.११.२०१५ रोजी झालेल्या ९६ व्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२३११२४०२५८३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Pandurang Wadte

Digitally signed by Kiran Pandurang Wadte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Kiran Pandurang Wadte
Date: 2015.12.31 12:42:53 +05'30'

(कि.पां.वडते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
२) जिल्हाधिकारी, औरंगाबाद,
३) उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद,

४) तहसिलदार, औरंगाबाद,
५) अपर तहसिलदार, औरंगाबाद,
६) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद,
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
८) कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग (कार्यासन ई-३/ई-८/ई-९/ई-१०/ब-१), मंत्रालय, मुंबई-४०००३२.
९) वित्त विभाग (का. विसू-१/ अर्थसंकल्प -६/ व्यय-९), मंत्रालय मुंबई-४०००३२.
१०) महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने

प्रत माहितीसाठी:-

१) मा.राज्यापालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०००३५.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३) मा.मंत्री महसूल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
४) मा. राज्यमंत्री महसूल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
६) अपर मुख्य सचिव (रवका), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
७) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
८) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
९) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१०) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
११) प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१२) निवड नस्ती, कार्यासन म-१०